# बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त 'डी' विभाग यांचे कार्यालय,

जोबनपुत्र कंम्पाऊंड, नानाचौक, ग्रँट रोड, मुंबई-४०० ००७.

क्र. स.आ.डी./ ६५७ /सहा.अभि./ घ.क.व्य./ डी दि. १७ / ०९ /२०२६.

## स्वारस्य अभिव्यक्ती

'डी' विभागातील बाणगंगा तलाव, वाळकेश्वर येथे पितृपक्ष निमित्त बाणगंगा तलाव परिसर व सभोवतालचे रस्ते यांची विशेष स्वच्छता ठेवण्याकरिता अशासकीय संस्थांमार्फत कामगार वापरण्याबाबत हे काम करण्यासाठी इच्छुक संस्थांकडून पात्रता यादी तयार करून स्वारस्य अभिव्यक्ती मागवित आहे. सदर कामासाठी अशासकीय संस्थांना पितृपक्ष कालावधीमध्ये साफ सफाई कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

इच्छुक अशासकीय संस्थांनी याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी रु. ४७२/- (रु. ४००/- + १८ % जी.एस.टी.) एवढी रक्कम नागरी सुविधा केंद्रामध्ये भरणा केल्यानंतर सहा. अभियंता (घकव्य) 'डी' विभाग यांच्या कार्यालयात दि.१७.०९.२०२६ ते दि.२३.०९.२०२६ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येईल. 'डी' विभागात साफ सफाई करण्याचा अनुभव असणाऱ्या संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

संस्थेने 'डी' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि.२३.०९.२०२६ (दु.०१.०० वाजेपर्यंत ) आहे.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) 'डी' विभाग**